**कठीण------------प्रश्न---!!!!**

नियतीने जर अभिनंदन केले,
म्हणाली अमुक वर्षाचा झालास,
पण खरे सांग,
कधी किती जगलास ?

आकाशाने जर अभिनंदन केले,
म्हणाला अमुक वर्षाचा झालास,
पण खरे सांग,
माझी ऊंची गाठलीस ?

सागराने जर अभिनंदन केले,
म्हणाला अमुक वर्षाचा झालास,
पण खरे सांग,
माझ्या गहराईत पोहोचलास ?

सरणावरची लाकडे विचारतील,
पण खरे सांग,
आमच्या सारखा कोणासाठी ही,
सर्वस्व देवून कधी जळलास ?

वरील प्रश्नांचे तुमचे उत्तर,
जर होय असेल तर,
तुमचा अहंपणा वाजवी !!

**डॉ. विनोद अडबे**
१४-४-२०१८.